पुणे महानगरपालिका

*** शहर सुधारणा समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक – १४**

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार, दि. १२ /१०/२०१० रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्रं. ७४**

**मा.सुनिल टिंगरे यांचे दि. २७/९/२०१० चे पत्र.**

वॉर्ड क्र.१ धानोरी येथील सर्वे नं.२४ मधील ६० फुटी डी.पी.रस्त्यांमध्ये जवळ जवळ ६० ते ७० घरे बाधीत होत असलेने सदर रस्त्यांच्या फेर आखणी बाबत कलम ३७/१ ची कार्यवाही करणेत यावी.

**विषय क्रं. ७५**

**मा.प्रमोद भानगिरे यांचे दि. ४/१०/२०१० चे पत्र.**

पुणे पेठ महमदवाडी स.नं.२ या मिळकतीसाठी मान्यता प्राप्त विकास आराखड्यामध्ये कोणताही रस्ता दर्शविला नसल्याने सदरहू मिळकत लॅन्डलॉक झालेली आहे. या मिळकतीचे दक्षिण पश्चिम हद्दीवर स.नं.११ हा सरकारी गायरान आहे. या गायरानातून पूर्व पश्चिम असा १५ मी.चा डी.पी.रस्ता गेलेला असून तो रस्ता तयार आहे. या १५ मी.विकसित रस्त्यापासून स.नं.३ मधील ॲमिनिटी स्पेसला लागून पश्चिम हद्दीवरून उत्तरेकडे १८ मी.रुंदीचा रस्ता दक्षिण उत्तर असा आखल्यास सदरहू स.नं.२ या मिळकतीचा प्रवेश मार्ग उपलब्ध होईल.

सबब महमदवाडी स.नं.११ मधून दक्षिणो उत्तर असा १८ मी.रूंदीचा रस्ता मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखण्यात यावा.

**विषय क्रं. ७६**

**मा.ॲड.किशोर शिंदे यांचे दि. ५/१०/२०१० चे पत्र.**

पौड रोड ते आझादवाडी वनाज सोसायटी व अलकापूरी सोसायटी मधून जाणारा रस्ता कलम २१० अन्वये आखून रस्ता तयार करण्यात यावा.

**विषय क्रं . ७७**

मौजे कोथरूड स.नं.९२ आणि ९३ येथील कचरा डेपोच्या वापर असलेल्या मिळकतीच्या आरक्षणामध्ये फेर बदल करून शिवसृष्टी उभारणेकरीता सिव्हीक कल्चरल सेंटर ( सी.सी.) असा बदल करणे एम.आर.टी.पी.ॲक्ट ३७ ( २ ) अन्वये कारवाई करण्यासंदर्भात राज्य शासनास प्रस्ताव सादर करणेसाठी मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता घेणे विषयी तसेच कोथरूड येथील बी.डी.पी.झोन मधील सुमारे ७५ एकर जागा संपादित करून त्या ठिकाणी शिवसृष्टी उभारणेसाठी राज्य शासनाची मान्यता घेणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/न.अ./४३५, दि. २७/९/२०१० चे पत्र.

**विषय क्रं. ७८**

पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता या पदाच्या एकूण मंजुर पदांपैकी ५०%टक्के जागा पुणे मनपा मधील पात्र सेवकातून खाते अंतर्गत नेमणूका करणे व खाते अंतर्गत सेवकास कनिष्ठ अभियंता ( सि ) या पदाकरीता कमीत कमी आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक पात्रतेचे निकष लावणेबाबत मा.भिमराव तापकीर व सौ.मंगला मंत्री यांचे दि. २७/९/२००७ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र.२५५,दि.३/१०/२००७ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांचे जा.क्र.मआ/उआ/से/४४४ दि.२९/९/२०१० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्रं. ७९</u>

वारजे स.नं.८०/२/१ मधून विघ्नहर्ता सोसायटीकडे जाणारा कलम २०५ अन्वये रस्ता आखणेबाबत मा.किरण बारटक्के व मा.मुरलीधर मोहोळ यांचे दि. १०/६/२००९ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. ६६, दि.१०/६/२००९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त ( वि ) यांचे जा.क्र.मआ/न.अ./४४७, दि. ३०/९/२०१० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>विषय क्रं. ८०</u>

**मा. वसंत मोरे व मा.शंकरराव बेलदरे यांचे दि.०९/०९/२०१० चे पत्र.**

आंबेगाव खुर्द स.नं.५/९ व ५/१० या मिळकतीमधील बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९ चे कलम २२४ अन्वये दि.३०/९/२००९ रोजी सार्वजनिक घोषित करण्यात आलेला २० फूटी पूर्वीचा रस्ता रद्द करून त्याच मिळकतीत पश्चिम हद्दीवर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम १४.४.१ जी.अन्वये स्थलांतरीत करण्यात यावा.

( टिप : – विषय क्र.८० ची जागा पाहणी दि. ५/१०/२०१० रोजी करण्यात आली. )

<u>विषय क्रं. ८१</u>

**मा.सौ.अश्विनी कदम, मा.दत्ता धनकवडे यांचे दि. २३/०८/२०१० चे पत्र.**

शहर सुधारणा समिती ठराव क्र. २३८, दि. १०/०२/२०१० दफ्तरी दाखल करण्यात यावा.

( पर्वती स. नं. ६३, प्लॉट क्र. ८ मधून पुणे सातारा रस्त्यापासून मोरे वस्ती या घोषित झोपडपट्टीपर्यंत २० फुट रुंदीचा रस्ता बी. पी. एम. सी. ॲक्ट कलम २०५ अन्वये आखलेला रस्ता रद्द करण्यात यावा.)

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागिल सभेत ठरले होते. )**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**